जीवन एक संघर्ष है, लेकिन जब तक हम संघर्ष करते रहते हैं, सफलता हमारे साथ होती है।

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ४ फेब्रुवारी २०२५ | अंक५७ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

## नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

वाल्मीक कराड हा त्या वेळी तिथे आलेला मला माहीत नव्हत, धनंजय मुंडेंनी ओळख करून दिली होती, तेव्हा मी म्हणालो हा तोच आहे का हार्वेस्टरचे पैसे बुडवणारा. अनेक राजकिय नेते मला भेटायला आले पण आम्ही कुणाला शब्द दिला नव्हता, देणारही नव्हतो कारण आमचं गणित जुळवणं सुरू होतं. हार्वेस्टर खरेदी करणा-या लोकांना वाल्मिक कराडने मारलं होतं ते लोक माझ्याकडे आले होते, माझ्याकडे लोक आल्यानंतर त्यांच्या एका मध्यस्थीने हा विषय मिटवला आणि तो विषय तिथे थांबला आसा खुलासा मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी बोलताना केला.

# धनंजय मुंडे रात्री २ वाजता भेटले, वाल्मिक कराडही होते, सगळे पाया पडले

## मराठ्यांनी मोठं केलं; मला सांभाळा धनंजय मुंडे यांच्यावर हल्लाबोल

बीड जिल्ह्याच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, या घटनेनंतर राज्यातील वातावरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणात सुरुवातीपासूनच मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रकरणात आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर एक जण अद्यापही फरार आहे. दरम्यान या प्रकरणातील सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, वाल्मिक कराडवर देखील मकोका लावण्यात आला आहे. आज पुन्हा एकदा बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी वाल्मिक कराड आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल करत मोठा खुलासा






केला आहे.नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील? निवडणुकीच्या काळात धनंजय मुंडे हे आपल्याला भेटायला आले होते, त्यांनी त्यावेळी वाल्मिक कराडची माझ्याशी ओळख करून दिली, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान धनंजय मुंडे हे पाया पडले का? असा प्रश्नही त्यांना यावेळी विचारण्यात आला, यावर त्यांनी थेट बोलणं टाळत काही राजकीय सामाजिक संकेत असतात ते पाळावे लागतात मी पाळत असतो, येणारा प्रत्येक जण मदत करा म्हणत होता पाया पडणे हा लय मोठा विषय आहे असं मला वाटत नाही, असं यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. धनंजय मुंडे हे मला मराठ्यांनी सांभाळलं असं सांगत होते, पण मग मराठ्यांनी सांभाळलं तर आता मराठ्यांचेच मुडदे पाडायला लागले का? ही खूप दुर्दैवाची गोष्ट आहे. धनंजय मुंडेने मला दोन ते तीन वेळा भेटायचा प्रयत्न केला, गेवराईपर्यंत पण आला होता तिथून माघारी गेला नंतर आठ दिवसांनी परत भेटायला आला

## सारथी संस्थे अंतर्गत वस्तीगृह अभ्यासिका ग्रंथालय उपलब्ध करुन द्यावेत



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : जिल्ह्यात सारथी संस्थे अंतर्गत सुसज्ज इमारत,वस्तीगृह, अभ्यासिका,ग्रंथालय,प्रशिक्षण सभागृह या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.अशी मागणी छावा मराठा संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी अभिजित राऊत व उपअभियंता इंजि.ओमप्रकाश काळे सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे करण्यात आली आहे.यावेळी छावा मराठा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि.तानाजी हुस्सेकर, जिल्हाध्यक्ष इंजि.प्रविण जाधव,संघटक प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे पाटील,प्रवक्ता डॉ.प्रभाकर जाधव,डॉ. कल्पना कदम,दीपक पाटील राजूरकर,शहराध्यक्ष अजय मुंगल,प्रा.गजानन जाधव,राम शिंदे,सौ.सारिका कदम, सौ.सविता जाधव आदींची उपस्थिती होती.

## नामदेव शास्त्रींच्या वक्तव्याने भावना दुखावल्या; मराठा समाज आक्रमक, पोलीस अधीक्षकांना निवेदन




संतोष देशमुख हत्या प्रकरणात भगवानगडचे महंत नामदेव शास्त्रींनी उडी घेतल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाला वेगळेच वळण आले आहे . गेल्या अनेक दिवसांपासून या प्रकरणात वाल्मीक कराडशी निकटचे आणि आर्थिक संबंध असल्याचा मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप होतोय . दरम्यान, नामदेव शास्त्रींनी धनंजय मुंडे निर्दोष असल्याचे वक्तव्य केल्यानंतर मनोज जरांगेंनी हा जातीयवादाचा अंक असल्याचा आरोप केला होता .आता धनंजय मुंडे यांना पाठिंबा देऊन नामदेव शास्त्री यांनी वंजारी आणि मराठा समाजात तेढ निर्माण करत असल्याचा आरोप करत मराठा समाजाने पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले आहे. नामदेव शास्त्रींच्या वक्तव्याने मराठा समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. नामदेव शास्त्रींनी त्यांचे वक्तव्य मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे. नामदेव शास्त्री यांच्या वक्तव्याने मराठा समाज आक्रमक भगवानगडचे महंत नामदेव शास्त्री यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे सकल मराठा समाजाच्या भावना दुखावल्याने त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी विनंती मराठा कार्यकर्त्यांनी अहिल्यानगर पोलीस अधीक्षकांना केली आहे . महंत व नामदेव शास्त्री यांनी केलेल्या वक्तव्यामुळे जातीयवाद वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे

## बाळासाहेब शेंदुरकर यांच्या खेळ कुस्ती या पुस्तकाचे प्रकाशन




दि ०२/०२/२०२४ रोजी अहिल्यानगर येथे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ ने आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धे निमित्त मन्यवरांच्या हस्ते पै.फखेळ कुस्तीफ या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजित पवार साहेब यांच्या हस्ते करण्यात आले आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या या भव्य आणि दिव्य स्पर्धेच्या समारंभास केंद्रीय मंत्री पै श्री मुरलीधर अण्णा मोहोळ, क्रीडामंत्री ना श्री दत्तात्रय भरणे साहेब विधान परिषदेचे सभापती आदरणीय श्री राम शिंदे सर पालकमंत्री आदरणीय राधाकृष्ण विखे पाटील आदरणीय आमदार श्री अरुण काका जगताप आमदार संग्राम भैया जगताप माननीय आमदार श्री कटके पुणे कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष श्री रामदास भाऊ तडस माजी आमदार श्री भीमराव धोंडे अभिनेता प्रवीण तरडे, माजी आमदार श्री बाळासाहेब आजबे हिंदकेसरी पै योगेश दोडके माननीय संदीप आप्पा भोंडवे श्री विलास कथुरे सर व महाराष्ट्र केसरी पै सईद चाऊस पै अक्षय कर्डिले अदि मान्यवर सह असंख्य कुस्ती शौकीन पत्रकार बांधव यांच्या उपस्थितीत संपन्न झाले मी सर्वांचा खूप खूप आभारी आहे ऋणी आहे ६७ वे अधिवेशन अहिल्यानगर येथे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आयोजित भव्य दिव्य अहिल्यानगर येथे यशस्वी संपन्न झाले. हे पुस्तक श्री बाळासाहेब हरिचंद्र शेंदुरकर सर यांनी लिहिले आहे यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व क्रीडाविषयक असे पाच पुस्तके आयएसबीएन नंबर सहित प्रकाशित केलेली आहेत. शब्दगंध प्रकाशन संस्थेचे चे श्री सुनील गोसावी सर यांचे मार्गदर्शन लाभले आहे मखेळकुस्तीफ पुस्तकाच चे प्रकाशन केल्याबद्दल मित्रपरिवारांनी खेळाडूंनी,मल्लांनी शिक्षक वृंद,पत्रकार बांधव, शब्दगंध परिवाराच्या वतीने अदिंनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## श्री संत मीराबाई आईसाहेब यांच्या २७ वी पुण्यतिथी निमित्त ह. भ.प.नंदिनीताई महाराज याचे किर्तन

पाटोदा (प्रतिनिधी) श्री संत मीराबाई आईसाहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार नंदिनीताई महाराज यांचे दिनांक ४ फेब्रुवारी मंगळवार रोजी श्री.क्षेत्र मीराबाई आईसाहेब संस्था महासांगवी या ठिकाणी अमृततुल्य असे किर्तन होणार आहे. तरी पाटोदा आणि पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या किर्तनाचा अवश्य लाभ घ्यावा. असे आवाहन या सप्ताहाचे आयोजक श्री.क्षेत्र मिराबाई आईसाहेब संस्थांच्या मठाधिपती महंत राधाताई महाराज (आईसाहेब) यांनी केले आहे. तरी पाटोदा आणि पाटोदा पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या सर्व किर्तनाचा व शिव महापुराण कथेचा लाभ घ्यावा. समस्त ग्रामस्थ महासागवी कवडवाडी यांनी आव्हान केले आहे.



# सर्व सरकारी कार्यालयात मराठी बोलणे अनिवार्य, फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

मराठी भाषा संवर्धनासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. आता महाराष्ट्र ातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि महापालिका कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिर्वाय करण्यात आले आहे. मराठा भाषा बोलणे आणि मराठी व्यवहार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी आता राज्य सरकारने मोठे पाऊल उचलावे लागते. शासकीय कार्यालयात सर्वत्र मराठी फलक असणार आहेत. तसेच मराठी भाषेचा वापर करण्यास नकार देणा-यांवर शिस्त भंगाची कारवाई करण्यात येणार आहे.मराठी भाषेला अलिकडेच केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेचे म हत्व टीकविण्यासाठी मराठी बोलणे आणि मराठीत व्यवहार करणे गरजेचे आहे. त्यामुळे आता राज्य सरकारने मराठी भाषेचे संवधर्न करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. आता महाराष्ट्राच्या सर्व शासकीय, निमशासकीय आणि महापालिका कार्यालयात मराठी बोलणे अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. आता सरकारी कार्यालयात दर्शनी भागात मराठी भाषेत बोलण्याबद्दल दर्शनी भागात फलक लावण्याचे बंधन करण्यात येणार आहे.शिस्तभंगाची कारवाई होणारमराठी भाषा बोलण्याबद्दल दर्शनी भागात फलक लावावा लागणार आहेत. शासकीय



कार्यालयांतील संगणकावरील कळफलक देखील मराठी भाषेतच असणार आहेत. मराठी भाषेचा वापर करण्यास नकार देणा-यांवर शिस्तभंगाची कारवाई होणार आहे. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अनुसार सर्व शासकीय कार्यालयांतील मूळ प्रस्ताव, सर्व पत्रव्यवहार, टिप्पण्या, आदेश, संदेशवहन मराठीतच असतील आणि कार्यालयीन स्तरावरील सर्व प्रकारची सादरीकरणे आणि संकेतस्थळे मराठीत असतील याची काळजी घेण्याचे आदेश राज्य सरकारने पारित केले आहे.

## केंद्र सरकारच्या कार्यालयातील फलक मराठी

केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये आणि सर्व बँका इत्यादींमध्ये दर्शनी भागात लावण्यात येणारे सूचनाफलक, अधिका-यांचे नामफलक, अर्ज नमुने मराठीतून असणे अनिवार्य करण्यात आले आहे. शासकीय आणि निमशासकीय आस्थापनांची तसेच महामंडळे, मंडळे, शासन अंगीकृत उपक्रम, कंपन्या यांची शासनाने (मंत्रिमंडळाने) निश्चित केलेली मराठी नावेच आस्थापनांच्या कामकाजात वापरली जातील. नवीन नावे निश्चित करताना मराठीतील एकच नाव निश्चित केले जाईल. त्याचे इंग्रजीत भाषांतर न करता रोमन लिपीत केवळ त्याचे रुपांतर करण्यात येईल. ज्या आस्थापनांना द्विभाषिक नावे आहेत त्यांचा कारभार यापुढे मराठी नावाने होईल असे सरकारने म्हटले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ४ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

# व्याघ्र पर्यटन दशा आणि दिशा

जरी ती सन २०२४च्या शेवटच्या सूर्यास्ताची सायंकाळ असली तरी उमरेड पवनी कऱ्हांडला अभयारण्यासाठी ती रोजच्या सारखीच होती. वर्षाचा शेवट निसर्गाच्या सानिध्यात, त्यातही वाघीण आणि नवजात पिल्लांसमवेत संस्मरणीय व्हावा, या इच्छेने ठिकठिकाणचे व्याघ्रप्रेमी तसेच वन्यजीव छायाचित्रकार तेथे आले होते. कारणही तसेच होते. अभयारण्यातील तीन-तीन वाघिणी आपल्या नवजात पिल्लांसह सहज दृष्टीस पडतात, ही बातमी देशभरातील वन्यजीव प्रेमींच्या समाज माध्यमावर पसरली होती. त्यातही तीनपैकी एक वाघीण तर चक्क पाच पिल्लेवाली ! विस्मयचकीत करणारीच बाब होती ही. वाघिणीला दोन-तीन पिल्ले होणे ही सामान्य बाब आहे. चार पिल्ले होणे खरोखरच विशेष बाब असते. परंतु एका वेळी पाच पिल्ले ही निश्चितच विलक्षण घटना असते. सूर्यास्त होण्यास थोडाच अवधी शिल्लक होता. तशात उमरेड पवनी कहांडला अभयारण्यातील ३१ डिसेंबरच्या सायंसफारीमध्ये असे काही घडले की सारे वन्यजीव पर्यटनविश्व ढवळून निघाले, खडबडून जागे झाले. नववर्षाच्या शुभेच्छांचे अदान-प्रदान सुरू असतानाच उमरेडच्या सफारीतील त्या घटनेची दोन मिनिटे सदतीस सेकंदाची एक चित्रफित समाज माध्यमांवर पसरली. अभयारण्याच्या गोठणगाव पर्यटन क्षेत्रातील धरणालगतच्या अत्यंत अरुंद पारीवरून जाणाऱ्या एका रस्त्यावर एफ २ ही वाघीण आपल्या पाचही पिल्लांसह पर्यटक वाहनांच्या गराड्यात घेरली गेली. त्यातून निर्माण झालेला अभूतपूर्व गोंधळ, कोलाहल आणि तशाही परिस्थितीत मोबाइलद्वारे छायाचित्रण करण्यासाठी पर्यटकांनी केलेली धडपड. व्याघ्रकेंद्रित वन्यजीव पर्यटनाचा तो अतिरेक निश्चितच संतापजनक आणि उबग आणणारा होता! ही चित्रफित बघताना एक गोष्ट सहज लक्षात येते. एवढ्या गोंधळात वाघीण मात्र तशी निवांतच दिसत होती. खरेतर जगातील सर्वांत ताकदवान शिकारी असलेल्या वाघाच्या नुसत्या रोखून बघण्याने काळजाचे पाणी पाणी होते. त्यातही पिल्लांसमवेत असणारी वाघीण म्हणजे अत्यंत आक्रमक माता, प्रसंगी जी पिल्लांजवळ आलेल्या मोठ्या बलदंड नर वाघालाही सोडत नाही. येथे तर वाहनांच्या कोंडीत पिल्लांसह अडकलेली वाघीण होती. अरुंद रस्ता आणि रस्त्याच्या दोन्ही बाजू अवघड तीव्र उताराच्या. वाघिणीच्या एका झेपेच्या अंतरावर उघड्या जिप्सीतील गोंधळ घालणारे पर्यटक. काहीही घडू शकले असते... जर वाघिणीने ठरविले असते तर! पण... भारतातील वन्यजीव तसेच व्याघ्न पर्यटनाच्या आत्तापर्यंतच्या इतिहासात मध्य प्रदेशातील बांधवगड व्याघ्र प्रकल्पातील एक घटना वगळता कोणत्याही वन्यप्राण्याने एकाही पर्यटकाला कधी साधा ओरखडाही काढलेला नाही. अर्थात वाघ आणि हत्ती, त्यातही अनेकदा हत्ती, यांनी पर्यटकांच्या वाहनावर आक्रमक होत भीती दाखविण्याचे प्रताप केलेले आहे. याउलट वाघांशी अतिजवळीक साधणाऱ्या घटना सतत घडत असतात. अशा चित्रफिती समूहमाध्यमावर सामायिकही होत असतात. या घटना अनेकदा महाराष्ट्रातील असतात, हेही खरे! या चित्रफिती बघून क्वचित कधीतरी किंवा कधीच व्याघ्र पर्यटन अनुभवले नसलेल्यांना धक्का बसतो. भीतीही वाटते. एवढ्या उमद्या प्राण्याची झालेली केविलवाणी अवस्था बघून संतापही येतो. फारच झाले तर काही प्रसंगी वन विभाग स्थानिक पातळीवर कार्यवाहीदेखील करते. परंतु या कार्यवाहीचा असर लवकरच ओसरतो. उमरेड पवनी कहांडला अभयारण्यात ३१ डिसेंबर घडलेल्या घटनेची दखल मात्र गांभीर्याने घेतली गेल्याचे दिसते. याची चौकशी मात्र स्थानिक प्रशासनानेच केली. तथापि, चार पर्यटक मार्गदर्शक आणि चार वाहनचालक यांच्यावर दंडात्मक कारवाई करून त्यांना काही काळ अभयारण्य प्रवेशबंदीही घालण्यात आली. पाठोपाठ वरिष्ठ पातळीवर निर्णय होऊन महाराष्ट्रातील सर्व संरक्षित क्षेत्रात पर्यटकांच्या मोबाइल वापरावर बंदी घालण्यात आली. अर्थात या कारवाईमुळे भविष्यात अशा घटना होणार नाही याची काय खात्री ? बहुदा हेच लक्षात घेऊन या घटनेची चित्रफित बघणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे सन्माननीय न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि वृषाली जोशी यांनी धक्कादायक आणि विचलित करणारी घटना असे मत व्यक्त करत स्वतःहून याचिका दाखल करून घेतली. सुनावणीच्या वेळी वन विभागाने केलेली दंडात्मक कारवाई पुरेशी नसून वन्यजीव पर्यटनासाठी व्यापक मानक प्रक्रिया (एसओपी) तयार करण्याचे आदेश न्यायमूर्तींनी दिले. या आदेशानुसार नवीन मानक प्रक्रिया तयार करण्यासाठी बोर व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली आहे. ही समिती योग्य पर्यटन व्यवस्थापन पद्धतीबरोबरच निसर्ग मार्गदर्शक, वाहनचालक तसेच पर्यटक यांच्यासाठी नियमावली तयार करणार आहे. तसे प्रतिज्ञापत्र वन विभागाने उच्च न्यायालयात दाखलही केले आहे.

# आनंदाची पखरण

पैसा, प्रसिद्धी, प्रशंसा, हेच आपले ध्येय आहे का हे ठरवायला हवे. कौतुक, मानसन्मानातून मिळणारा आनंद क्षणिक असतो. अर्थात, कुणी काय करायचे, हा ज्याचा त्याचा प्रश्न. आजच्या धकाधकीच्या जीवनात आबालवृद्ध सगळ्यांनाच समस्यांनी ग्रासलेले असते. ईर्ष्या, स्पर्धा, महत्त्वाकांक्षा... जो तो धावत असतो, केवळ जिंकण्यासाठी. वेळप्रसंगी स्पर्धा, ध्येय, महत्त्वाकांक्षा हे सारे आवश्यक असतेच; पण नेमके थांबायचे कुठे, हे कळायला हवे. पैसा, प्रसिद्धी, प्रशंसा, हेच आपले ध्येय आहे का हे ठरवायला हवे. कौतुक, मानसन्मानातून मिळणारा आनंद क्षणिक असतो. अर्थात, कुणी काय करायचे, हा ज्याचा त्याचा प्रश्न. माझं सांगायचं तर रोज सकाळी घरातून बाहेर पडल्यापासून रात्री घरी जाईपर्यंत चांगल्या-वाईट अनेक गोष्टी घडत असतात. पण काहीही झालं तरी आला दिवस काढावा लागतोच. रोजच्या धावपळीत आनंद कुठे आणि कसा घ्यायचा? आनंद घ्यायला वेळ आहे कुठे? पण त्यातही मी आता आनंद शोधतेय. अगदी सकाळी रेडिओवरची ङ्गजगू या आनंदीफ ही मालिका ऐकली की खरंच मन आनंदी होतं. सकाळपासून ऐकलेल्या गाण्यातली एखादी आवडती ओळ गुणगुणत बाहेर पडलं की मनाला उभारी येते. रोजच्या प्रवासात तर तऱ्हेतऱ्हेची माणसं भेटतात. कधी तरी एखादी व्यक्ती जीवनाचे तत्त्वज्ञान सांगून जाते. कधी कुणी कसलीशी आशा दाखवून जातं. कधी खूप उशीर झाला म्हणून उद्विग्न होऊन बसलेले असताना नात्यागोत्याची नसलेली एखादी अडाणी बाई गाडीतून खाली उतरताना, ङ्गलय रात झाली गं पोरी सांभाळून जाय नीट,फ असं पोटतिडकीनं सांगते तेव्हा मन सुखावून जातं. कधी मी पंढरीच्या वारकऱ्यांची वारी अनुभवते. कधी अयोध्येच्या भक्तगणांकडून आनंद घेते. कधी ब्रह्मगिरीच्या फेरीचे किस्से ऐकते तर कधी कॉलेजियन्सच्या गप्पाही ऐकते. कधी तरुण-तरुणींच्या गाण्याच्या भेंड्यांचा आनंद लुटते. वेगवेगळ्या भाषांची गंमत अनुभवते. भांडणाची कमतरता तर कधीच नसते; पण भांडणाऱ्यांची तऱ्हा बघून त्यातही हसू फुटते. एखाद्या गोंडस बाळाचा स्पर्श मोरपीस फिरवून जातो. एखाद्या चिमुकल्याचं निरागस हास्य निखळ आनंद देऊन जातं. हे सगळं काय? आनंदच की... म्हटलं तर रोजचा त्रास खूप आहे. पण बाहेर मन विदीर्ण करून जाणाऱ्या काही घटना पाहते, तेव्हा ङ्गमी खूप सुखी आहे,फ याची जाणीव होते. मला खरा आनंद देतो तो निसर्ग. वर्षानुवर्षे ट्रेनमध्ये बसून पाऊस अनुभवण्याचा आनंद लुटलाय मी. श्रावणातला हिरवाकंच निसर्ग, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या- नाले, दारणेचं नजर पोहोचणार नाही, असं अथांग पाणी. हिरवी शाल पांघरलेल्या डोंगरदऱ्या. ट्रेनमध्ये खिडकीत बसून पाऊस पाहण्याचा आनंद काही औरच. धाडधाड कोसळत तो मनाची सारी जळमटं धुवून काढतो. रिमझिम बरसतो, तेव्हा मनात मोर नाचत असतो. यासारखा दुसरा आनंद तो कोणता? लांबचलांब पसरलेल्या द्राक्षाच्या बागा, चौकोनी वाफ्यांमधल्या हिरव्यागार पालेभाज्या, उंचचउंच उभे उसाचे मळे, वाऱ्यावर डोलणारी ज्वारी-बाजरी ची कणसं, पक्ष्यांचे थवे, एखादया शेतात हळदीकुंकवाच्या सड्यासारखा दिसणारा झेंडूचा ताटवा, वसंतात एखाद्या बांधावर फुललेला पळस. हे सगळं आनंदाची उधळण करत असतं निस्वार्थपणे. यापेक्षा आणखीन नेत्रसुख ते काय? कधी अचानक लांब शेपटीचा, तपकिरी रंगाचा भारद्वाज दृष्टीस पडतो आणि उगाचच खुळी आशा, आज काही तरी चांगलं घडणार, म्हणून सुखावून जाते. या व अशा अनेक गोष्टी मला नवीन ऊर्जा, चैतन्य, उत्साह, आनंद देतात. सकारात्मक विचार करायला लावतात, शांत, संयमी बनवतात. दैनंदिन कामाचा थकवा- कंटाळा, चिंता एकाकीपणा दूर करतात. क्वचितच दिसणारं नदीपात्रातलं उगवत्या सूर्याचं प्रतिबिंब. संध्याकाळी मनमाड स्टेशनच्या पुलावरून दूरवर सोनेरी आकाशात अस्ताला जाणारा लालबुंद सूर्य, एका लयीत चालणारी नागमोडी, लांबलचक, वळणदार रेल्वे. हे सारं पुन्हा पुन्हा पाहावसं वाटतं. थोडक्यात काय, जे हवंहवंसं वाटतं तेच तर सुख असतं. प्रवासानं आणि निसर्गानं मला समृद्ध केलंय. प्रवास संपला तरी हे अविस्मरणीय, आनंददायीच राहील

# समाजात शिक्षकाचे सर्वोच्च स्थान ; शिक्षकांनी येणाऱ्या संधी चे सोने करावे-दादासाहेब गुंजाळ

## विस्तार अधिकारी संजय नरवडे व मुख्याध्यापक नवनाथ पाटील यांचा सेवापुर्ती सोहळा सपन्न



समाजात शिक्षकाचे सर्वोच्च स्थान असून शिक्षकाच्या गुरूतुल्य पदाबाबत तुलना होऊ शकत नाही.आजच्या घडीला मुलांना लवकरच्या संधी ओळखता आले पाहिजे. शिक्षकाने या मुलांना योग्य दिशा व मार्गदर्शन दिले तर ते मुलं पुढे मोठ-मोठे अधिकारी बनून मोठ्या पदावर काम करतील.येणाऱ्या संधी चे शिक्षकांनी सोने करावे असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ यांनी केले. दि.२९ जानेवारी २०२५ रोजी जामखेड तालुक्यातील खर्डा येथील खर्डा इंग्लिश स्कूल येथे विस्तार अधिकारी संजय नरवडे व पिंपळगाव उंडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ पाटील यांच्या सेवापुर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. पुढे बोलताना दादासाहेब गुंजाळ म्हणाले की,आज मल्टिमीडियाचे युग आहे, काळाची गरज आहे,अशा सेवानिवृत्तीच्या काळात नाती जपता आली पाहिजेत. एकमेकांना सांभाळल पाहिजे.एकमेकांच्या कामाचं कौतुक केले पाहिजे. यावेळी अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या वतीने सेवा पूर्तीच्या निमित्ताने कृतज्ञता निधी विस्तार अधिकारी संजय नरवडे व सप्त्नीक तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळगाव उंडा येथील मुख्याध्यापक नवनाथ पाटील यांना ११,००० हजार रुपये चा चेक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शुभम जाधव, केंद्रप्रमुख केशव गायकवाड, विकास मंडळाचे विश्वस्त व जामखेड तालुका शिक्षक समन्वय समिती अध्यक्ष मुकुंदराज सातपुते, आदर्श शिक्षक एकनाथ चव्हाण, बाळासाहेब जरांडे,शिक्षक नेते गोवर्धन दरेकर,अनिल अष्टेकर,महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष युवराज पाटील,अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँक शाखा जामखेड शाखाधिकारी मुकुंद ढवळे, प्रमोद पिंपरे, संतोष गोरे, अनंता गायकवाड,नारायण लहाने,विजयकुमार रेणुके, दत्तात्रय आंधळकर,कामिनी राजगुरू, सुवर्णा आंधळकर, अर्चना ढगे,अनिता पवार,रसिका गाढवे, आदी शिक्षक-शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाबूराव गिते, धिरजकुमार उदमले, बापूसाहेब कोळी, दत्तात्रय आंधळकर, ज्ञानेश्वर कौले, श्रीहरी साबळे, शहाजी जगताप, काकासाहेब कुमटकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त मुकुंदराज सातपुते यांनी केले तर आभार

# मुख्यमंत्री फडणवीस यांचे उपस्थितीमध्ये विधान परिषदेचे सभापती व जगज्जेत्या खो-खो खेळाडूंचा होणार सत्कार

आष्टी । प्रतिनिधी दि.५ फेब्रुवारी २०२५ रोजी खुंटेफळ साठवण तलाव थेट पाईपलाईन कामाची पाहणी आणि श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील समाधी मंदिराचे गाभारा बांधकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र विधान परिषदेचे नवनियुक्त सभापती ना.प्रा.राम शिंदे आणि जागतिक खो-खो स्पर्धेमध्ये जगज्जेतेपद मिळवलेल्या भारतीय संघातील सहभागी असलेल्या महाराष्ट्र राज्यातील महिला व पुरुष संघातील खेळाडूंचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी दिली.



आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या खुंटेफळ साठवण तलावाच्या थेट पाईपलाईन कामाची पाहणी आणि श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील समाधी गाभारा भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते होणार असून याच कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती पदी निवड झालेले प्राध्यापक राम शिंदे यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह असून या सभागृहाचे सभापती पदी आपल्या परिसरातील लोकप्रतिनिधीची निवड झाली आहे याचा आनंद म्हणून या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे खुंटेफळ साठवण तलाव येथे शिंपोरा तालुका कर्जत येथून उजनी धरणाचे पाणी थेट पाईपलाईन द्वारे येणार असून या पाईपलाईन कामाची पाहणी आणि संपूर्ण भारत देशातून दरवर्षी भाविक भक्त मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी येत असतात असे प्रसिद्ध क्षेत्र असलेले श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ समाधीस्थळ असलेले मायंबा येथील समाधी मंदिर गाभाऱ्याचे नव्याने बांधकाम होणार असून या बांधकामाचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हस्ते होत असून या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे नवनियुक्त सभापती प्राध्यापक राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून यानिमित्ताने प्राध्यापक नामदार राम शिंदे यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे खुंटेफळ साठवण तलाव हा आपला ड्रीम प्रोजेक्ट असून आष्टी आणि पाटोदा तालुक्यातील काही भागातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मराठवाड्याच्या हक्काचे ५.६८ टीएमसी पाण्यापैकी सध्या १.६८ टीएमसी मंजूर असून या प्रकल्पाद्वारे २८ हजार हेक्टर सिंचन होणार असल्यामुळे संपूर्ण आष्टी तालुक्याचे लक्ष या प्रकल्पाकडे लागून आहे दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या या कार्यक्रम स्थळाची पाहणी आमदार सुरेश धस यांनी केली असून त्यांचे संपूर्ण कार्यकर्ते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कामाला लागल्याचे दिसून येत आहे सुमारे एक लक्ष जनसमुदाय या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावा यासाठी जय्यत तयारी सुरू आहे.

## धक्कादायक! सुरेश धस यांचा पीए असल्याचं सांगत अधिका-यांकडून उकळले पैसे

मोठी बातमी समोर येत आहे, धाराशिवमधून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे, भाजप आमदार सुरेश धस यांचा पीए असल्याचं सांगून अधिका-यांकडून पैसे उकळण्यात आले आहेत. या घटनेमुळं खळबळ उडाली आहे, प्रकार समोर येताच पैसे उकळणा-याला मराठा आंदोलकांकडून चोप देण्यात आला आहे. आशिष विसाळ असं या पैसे उकळणा-या व्यक्तीचं नाव आहे.जनआक्रोश मोर्चाच्या नावानं तसेच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करायची आहे, असं सांगून हा व्यक्ती अधिका-यांकडे पैसे मागत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या व्यक्तीने आपण सुरेश धस यांचा पीए असल्याचं देखील भासवलं, दरम्यान हा प्रकार समोर आल्यानंतर मराठा आंदोलकांनी विसाळ याला चांगलाच चोप देत पोलिसांच्या स्वाधीन केलं आहे.आशिष विसाळ हा आमदार सुरेश धस यांच्या नावावर सरकारी अधिका-यांना धमकावत त्यांच्याकडून खंडणी वसूल करत असल्याचं समोर आलं आहे. त्यानंतर मराठा आंदोलकांनी या व्यक्तीला चांगलाच चोप देत पोलिसांच्या ताब्यात दिलं. विशेष म्हणजे या व्यक्तीनं माजी जिल्हाधिकारी प्रवीण गोडाम यांचं नाव आणि फोटो डीपीला ठेवला होता. आपण गोडाम यांचे खास मित्र असल्याचा दावा करत या व्यक्तीने अधिका-यांकडून पैसे उकळल्याचं समोर आलं आहे.

नाशिकचे आयुक्त आणि धाराशिवचे तत्कालीन जिल्हाधिकारी प्रवीण गेडाम यांचा फोटो डीपीला ठेवून पैसे गोळा करत असल्याचा आरोप आशिष विशाळ या व्यक्तीवर करण्यात आला आहे . दरम्यान आता या सर्व प्रकरणावर गोडाम यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. माझे कार्यक्षेत्र हे नाशिक आहे, मराठवाड्यामध्ये माझे नाव सांगून जर कोणी पैसे घेत असेल तर ते पोलिसांच्या निदर्शनास आणून द्यावे असे आवाहन नाशिकचे आयुक्त आणि धाराशिवचे तत्कालीन जिल्हाधिकारी प्रवीण गेडाम यांनी केले आहे.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कसबा विभाग किल्ले धारुर येथे आनंद नागरी वहळदी कुंकाच कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक राम लोखंडे सर यांनी केले तसेच शाळेचे मुख्याध्यापक जालिंदर मुंडे सर तनाजी लासुने सर वसंत राठोड सर श्रीमती वेशाली दिवटे तसेच सर्व शिक्षक वर्ग व मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते

## ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे क्षयरोगींना धान्य वाटपाचा कार्यक्रम



क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम जिल्हा रुग्णालय बीड व ग्रामीण रुग्णालय माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उपचार घेत असलेल्या क्षय रुग्णांना मोफत अन्न धान्य किटचे वाटप करण्यात आले या वेळी एकूण ११ लाभार्थ्यांना धन्य किटचे ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने वाटप करण्यात आले यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ विजय कट्टे,डॉ बडे, डॉ दबडगावकर डॉ काळे, डॉ रुद्रवार डॉ मिनाक्षी साळुंखे, डॉ शेजुळ डॉ वाघमारे यावेळी तालूका क्षयरोग सुपरवायजर अर्शद शेजुळ हे उपस्थित होते तसेच सर्व अधिकार आणि कर्मचारी उपस्थित होते

## प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र नागरिकांनी योजनेचा लाभ घ्यावा



प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा दोन या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी नेकनूर ग्रामपंचायत अंतर्गत नागरिकांच्या घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे नेकनुर येथील नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केले आहे. स्वतःचे पक्के घर नसलेल्या नेकनूर,सावंतवाडी,वैतागवाडी येथील नागरिकांना भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ घ्यावा.तसेच प्रधानमंत्री आवास योजना प्रक्रिया पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय झाल्यास किंवा आर्थिक मागणी झाल्यास त्यांनी ग्रामपंचायत कार्यालय येथे तक्रार करावी असे आवाहन नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केले

# मातंग, तत्सम वंचित, उपेक्षित समाजाने हालगी आंदोलनात सहभागी व्हावे-माजी नगराध्यक्ष के.मूर्ती

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : आरक्षण अनुसूचित जातीत अबकड वर्गीकरण करिता देशातील सर्व प्रमुख पक्षातील नेत्यांनी लेखी समर्थन व वर्गीकरणाला आदेश सुप्रीम कोर्टाचे असताना ही काहीनी वर्गीकरण अंमलबजावणी ला विरोधी भूमिका घेतली त्यामुळे अंमलबजावणी होत नसल्याने मादिगा, मातंग तत्सम वंचित उपेक्षित समाजासाठी वर्गीकरण अंमलबजावणी ही मागणी घेऊन एम आर एस पी राष्ट्रीय अध्यक्ष संघर्ष योद्धा मंदा कृष्णा मादिगानी यांनी जनआंदोलन पुकारले शुक्रवारी ७-फेब्रुवारी रोजी चलो हैदराबाद, एक लाख हालगी लोक कलावंता चा बुलंद आवाज तेलंगणा सरकार पर्यंत व आपल्या मुलं, मुलीच्या भविष्याकरिता वर्गीकरण अंमलबजावणी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन मातंग समाजाचे वरिष्ठ नेते मा.नगराध्यक्ष के मूर्ती यांनी केले आहे.ह्या अनुसूचित जातीत अबकड वर्गीकरणाचा मादिगा, मातंग तत्सम वंचित, उपेक्षित समाजाला लाभ मिळावा या उद्देशाने देश भर मोर्चा, आंदोलने एम आर पी एस राष्ट्रीय अध्यक्ष संघर्ष योद्धा मंदा कृष्णा मादिगा नेतृत्वाखाली झाले व होत आहे त्यांच्या ह्या लढ्यात ३० वर्ष वर्गीकरण अबकड साठी सतत संघर्ष करित देशातील प्रमुख पक्षांचे नेत्यांसोबत वर्गीकरण ची मागणी केली असताना सर्वांनी या मागणीसाठी समर्थन लेखी स्वरूपात दर्शविली व



सुप्रीम कोर्टाने ही वर्गीकरणाचे आदेशानुसार त्या,त्या राज्यांना दिले असताना ही तेलंगणा सरकार वर्गीकरण अंमलबजावणी हेतू समितीचे नुसती घोषणा केली वर्गीकरण अंमलबजावणी निर्णय घ्यावा ही मागणी होत असताना याला विरोध एक समाज करत आहे. आपल्या मुलं मुलीच्या भविष्याकरिता वर्गीकरण अंमलबजावणी तत्काल सरकार लागु करावी आपले संघर्ष योद्धा मंदा कृष्णा मादिगा ला अनेक पक्षांच्या राजकीय नेत्यांनी राज्यसभा, आमदार आशा ऑफर दिल्या होत्या परंतु मंदा कृष्णा मादिगा यांनी कोणत्याही प्रलोभाला दाद न देता माझं उद्देश केवळ वर्गीकरण अंमलबजावणी करिता जीवन असल्याचे एक जाहीर सभेत व्यक्त केले संघर्ष योद्धा मंदा कृष्णा मादिगा चे आवाहनाला आज पर्यंत झालेल्या सर्व आंदोलनात सहभागी झालो ७- फेब्रुवारी रोजी चलो हैदराबाद एक लाख हालगी लोक कलावंताचा बुलंद आवाज सरकार पर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्रातील मातंग, तत्सम वंचित, उपेक्षित समाजाने हालगी आंदोलनात पुरुष, महिला,युवा वर्गाने सहभागी व्हावे तसेच आपल्या मुलं मुलीच्या भविष्याकरिता वर्गीकरण अंमलबजावणी तात्काळ सरकार ने लागू करावी.यासाठी आपण सर्वांनी गटतट बाजूला ठेवून चलो हैदराबाद आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन मातंग समाजाचे वरिष्ठ नेते मा नगराध्यक्ष के मूर्ती यांनी केले आहे.

## अंकनाद पाढे सात्मीकरण स्पर्धेत स्वरा अडसूळ राज्यात प्रथम (शिऊर शाळेची स्वरा व शिक्षक यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव)

खर्डा ( प्रतिनिधी )

मॅप एपिक कम्युनिकेशन प्रा.लि.आणि राज्य मराठी विकास संस्था महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोकमान्य टिळक अंकनाद पाढे सात्मीकरण राष्ट्रीय स्पर्धेत जामखेड तालुक्यातील जि.प.प्रा.शाळा शिऊर या शाळेची इ,तिसरीची कु.स्वरा भरत अडसूळ या विद्यार्थीनीने राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.तसेच श्रेयस सुनिल तनपुरे इ. तिसरी याने उत्तेजनार्थ क्रमांक घेऊन बक्षिस पटकावले आहे.

शालेय अभ्यासक्रमात व व्यवहारिक जीवनात गणित या विषयाला अनन्यसाधारण महत्त्व



आहे.या विषयातील पाढे पाठांतर हा महत्त्वपूर्ण भाग आहे.यासाठी स्वराच्या शिक्षिका शिकाऊ प्रशिणार्थी श्रीम.ज्योत्सना नारायण शिंदे (राजगिरवाड) यांनी पाढे पाठांतराचे महत्त्व लक्षात घेऊन स्वराची नावनोंदणी केली. सातत्याने सराव घेऊन योग्य पद्धतीने पाढे सात्मीकरणाचे तंत्र विद्यार्थ्यांमध्ये विकसित केले.महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत जि.प.प्रा.शाळा शिऊर ता.जामखेड येथे ज्योत्सना नारायण शिंदे या शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणून कार्य करीत आहेत.त्यांनी अल्पवधीतच शाळेत अनेक उपक्रम राबवले आहेत.स्वराच्या या पाढे सात्मीकरणाचे व तीच्या मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गटविकास अधिकारी शुभम जाधव,गटशिक्षणाधिकारी विजय शेवाळे,शिक्षणविस्तार अधिकारी संजय नरवडे,केंद्रप्रमुख सुरेश मोहिते,सरपंच गिरीजा उतेकर,उपसरपंच आजिनाथ निकम,.एस.एम.सी. अध्यक्ष राजाभाऊ तनपुरे,उपाध्यक्ष सुनील तनपुरे, ग्रेड मुख्याध्यापक संतोष वांडरे यांनी स्वराचे व शिक्षिका शिकाऊ प्रशिणार्थी जोस्ना शिंदे यांचे अभिनंदन केले आहे.

जि.प.प्रा.शाळा शिऊर ही उपक्रमशील शाळा असून मुख्याध्याध्यापक संतोष वांडरे यांच्यासह आदर्श शिक्षक हनुमंत निंबाळकर,तेजस्विनी मासाळकर,आशा माने,निर्मला काळे ,नामदेव गर्जे,स्मिता सोनवणे व शिकाऊ प्रशिक्षणार्थी ज्योत्सना नारायण शिंदे हे शाळेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असतात.

## वडवणी येथे जगद्गुरू संत तुकाराम महाराज जयंती उत्सव संपन्न

वडवणी प्रतिनिधी

पाचवा वेद निर्माते, वारकरी संप्रदायाचे कळस म्हणजे तुकाराम महाराज यांची जयंती काल दि. ०२/०२/२०२५ रविवारी मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाली. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज जयंती आणि विठ्ठल रुक्मिणी विवाहाचे औचित्य साधून ह. भ. प. हरिदास महाराज सोळंके गुरूजी मोहखेडकर यांच्या निवासस्थानी वडवणी येथे संगीत भजन संध्याचे आयोजन करण्यात आले होते.या भजन संध्येसाठी हार्मोनियम साथ ह. भ प. श्री दगडू महाराज पारगावकर यांनी केली. मृदंग साथ ह. भ. प. ओम महाराज



कदम यांनी केली. गायनसाथी साठी ह. भ. प. सुधाकर महाराज पाऊले, विठ्ठलराव अंडील पारगावकर, प्रा. गोपीचंद घायतिडक सर, प्रदीप मस्के हे उपस्थित होते.

यावेळी या भजन संध्या कार्यक्रमात ताल सूर लय आणि भजनी ठेक्यायमधे सुरेल अभंग गायीले.या बरोबरच भयरवी गायनाने संपूर्ण परिसर हा भक्तीमय झाला होता. विविध गोड भजनी चालीत एक से बडकर एक संप्रदयीक चाली व गवळणी गायनाने तुकाराम महाराज जयती कार्यक्रम मोठ्या भक्तीमय वातावरणात संपंन झाला.

या सर्व उपस्थित परमार्थप्रेमी वैष्णवांचा सोळंके परिवारातर्फे शाल आणि श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

## शिवजन्मोत्सवानिमीत्त विविध स्पर्धा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद व इतर कक्ष आयोजित बहुजन प्रतिपालक कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सार्वजनिक शिवजन्मोत्सवा निमित्त दिनांक १५-फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी या दरम्यान घरगुती शिवजयंती सजावट स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा ,चित्रकला स्पर्धा मॅरेथॉन स्पर्धा यासह विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस २००० रु द्वितीय बक्षीस १००० रु तृतीय बक्षीस ५०० रु तर मॅरेथॉन स्पर्धेचे प्रथम बक्षीस ७००० रुपये द्वितीय बक्षीस ५००० रुपये तृतीय बक्षीस २००० रु असे बक्षीसांचे स्वरूप असेल ह्या सर्व स्पर्धा यशवंतराव चव्हाण मराठा मुलांचे वसतिगृह नवा मोंढा नांदेड येथे ठेवण्यात आल्या आहेत.या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थांच्या सुप्त कला गुणांना वाव देऊन सर्वांगीण विकास करण्याचा मराठा सेवा संघ सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती प्रामाणिक प्रयत्न करीत आहे.तरी सर्व शिवप्रेमी स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन मराठा सेवा संघ आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## विज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना यशस्वी करण्यासाठी डॉ.प्रमोद रहाटे,सुनील पाठक यांनी अथक परिश्रम घेतले- व्यंकटराव नेम्मानिवार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : विद्यार्थी केंद्रबिंदू मानून सेवाप्रतीपने काम करणा-या शिक्षका प्रति विद्यार्थी नेहमी कृतज्ञ असतात असे प्रतिपादन सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेम्मानिवार यांनी केले.सरस्वती विद्या मंदिर माध्यमिक व उच्च-माध्यमिक विद्यालयातील डॉ प्रमोद रहाटे व सुनील पाठक हे सेवानिवृत्त झाले त्यांच्या सेवा पूर्णता व कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करत असताना ते बोलत होते.प्राचार्य डॉ आनंद भंडारे, मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानिवार प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका विणा सिरमनवार, पर्यवेक्षक प्रा.रेणुकादास पहुरकर, संजय चव्हाण यावेळी मंचावर उपस्थित होते.

शाळेतले संस्कार विद्यार्थ्याला जीवनभर कामी येत असतात. विज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना यशस्वी करण्यासाठी डॉ प्रमोद रहाटे व श्री सुनील पाठक यांनी अथक परिश्रम घेतले त्यामुळे सरस्वती विद्या मंदिर शाळेचा नाव लौकिक झालेला आहे. असे विविध मान्यवरांनी आपल्या भाषणात गौरव उद्गार काढले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले कु. इशिता पत्की,वंशिता केंद्रे व ऋत्या चक्रवार





यांनी स्वागत गीत गायन केले.

मान्यवरांच्या हस्ते यावेळी शाल श्रीफळ व वस्त्र देऊन डॉ रहाटे व डॉ सौ रश्मी रहाटे, श्री पाठक व सौ मया पाठक यांचा संस्था व संकुलातील महाविद्यालय, शाळा यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रा सुहास कुलकर्णी, राधिका तिरमानवार यांनी सूत्रसंचालन, भारत हातमोडे यांनी प्रास्ताविक, सचिन ठोंबरे, पर्यवेक्षक संजय चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रमास माजी मुख्याध्यापक मुकुंदराव तिरमनवार, श्रीनिवास गोणेवार,विद्यार्थी संस्थेतील शिक्षक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचा शुभारंभ थाटामाटात संपन्न

## कलाकारांच्या शोभायात्रेने चंपावती नगरीचे लक्ष वेधले



बीड, प्रतिनिधी- रंगदेवताची पालखी सजवून, टॅक्टर, बैलगाडीवरून असंख्य बीडच्या कलाकारांनी एकत्रित येऊन आकर्षक अशी शोभयात्रा काढत चंपावती नगरीचे लक्ष वेधले. काल दि. ३ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारच्या सुमारास बीडच्या इतिहासत अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्यानंतर चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून कलाकारांची शोभयात्रा पहिल्यांदाच निघाली. या शोभायात्रेत पारंपरिक कलाकार, असंख्य बाल कलाकार जेष्ठ कलाकार आणि कलाप्रेमी यांनी मिळून शिवातीर्थावर वंदन करून नटराजाची पालखी वाजवत गाजवत मोठ्या थाटामाटात नाट्यमंदिरात आणली आणि नटराजाचे पूजन करून चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे उदघाटन करून मोठ्या थाटामाटात शुभारंभ केला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये संपन्न होत असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेच्या उदघाटन समारंभ प्रसंगी व्यापारी महासंघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री प्रमुख पाहुणे होते तर उदघाटक जेष्ठ कलाकार भरत अण्णा लोळगे उपस्थित होते. याबरोबरच दै दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, दै वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाठ, कलाकार किशोर धुताडमाल, जतीन वाघामारे, सोनल नहार, संस्कार भरतीचे प्रमोद वझे, बाळू सौंदतिकर यांच्यासह असंख्य कलाकार उपस्थित होते.

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे या तिघांनी मिळून सर्व मान्यवरांचे सत्कार करून आपल्या भाषणात स्पर्धेत सहभागी झालेल्या कलाकारांना शुभेच्छा दिल्या. काल दि. ३ रोजी समूह नृत्य मराठी माध्यम इयत्ता ४ थी ते दहावी वयोगटाच्या समूह नृत्य स्पर्धा पार पडल्या. याबरोबरच एकपात्री अभिनय स्पर्धा देखील संपन्न झाली.बाल कलाकारांचा चंपावती महोत्सव कायम सुरु ठेऊ- जगताप, मुळूक, गलधर बीड रंगभूमीला कलेचा मोठा वारसा लाभलेला आहे. हा कलेचा वारसा टिकवून ठेवण्यासाठी कलाकारांना पाठबळ देण्याचा आमचा निर्धार पक्का आहे. निवडणूक आणि राजकारणासाठी आम्ही चंपावती महोत्सव आयोजित करत नाहीत आणि कधी करणार नाहीत. बीडमध्ये प्रतिभासंपन्न कलाकार तयार होत राहावेत आणि कलाकारांचा बालेकिल्ला बीड जिल्हा ही ओळख अबाधित राहावी यासाठी आम्ही प्रतवर्षी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसाचे अवचित्त साधून बीडमध्ये चंपावती महोत्सव आयोजित करत राहणार आहोत असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार ४ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## आष्टी येथील फार्मसी कॉलेजमध्ये कॅम्पस इंटरव्यू व एकदिवशीय कार्यशाळा संपन्न

आष्टी येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च आष्टी (डी फार्मसी ,बी फार्मसी, एम फार्मसी) या कॉलेजमध्ये मंगळवार दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी एक दिवशीय कार्यशाळा व कॅम्पस इंटरव्यू (रोजगार मेळावा) संपन्न झाला या एकदिवशीय कार्यशाळेमध्ये औषधनिर्माण शास्त्र क्षेत्रामधील विविध पदावर कार्यरत राहिलेले, असलेले तज्ज्ञांनी या कॉलेजमधील डी फार्मसी, बी फार्मसी व एम फार्मसी मधील सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, या तज्ञांमध्ये श्री राजेंद्र पडाळकर (मार्केटिंग हेड मॅग्नम ग्रुप ऑफ हॉस्पिटल, माजी मार्केटिंग हेड युनिकेम, रॅनबॅक्सी, सिन्सान औषधनिर्माण इंडस्ट्री) व श्रीमती. प्रीती मेहता (जनरल मॅनेजर ईट्रल लाइफ सायन्स, माजी झोनल बिजनेस मॅनेजर सींनसान फार्मासुटिकल, मॅनेजर रोल लुपिन फार्मासुटिकल मुंबई ) हे होते. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना पुढील विषयावर मार्गदर्शन केले, औषध निर्माण कंपनीमधील विविध विभागची माहिती दिली, औषधनिर्माण कंपनीमधील वेगवेगळे विभाग कशा पद्धतीने चालतात, औषधनिर्माण कंपनीमध्ये असलेले विभाग मधील पदावर कशा पद्धतीने रोजगार मिळवता येतो, औषधी कंपनीमध्ये विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना कशा प्रकारचे रोजगार उपलब्ध आहेत, आज देशांमधील औषधनिर्माण क्षेत्रामध्ये काय काय बदल झाले आहेत, औषध निर्माण कंपनी मधील मार्केटिंग क्षेत्रात रोजगार मिळवण्यासाठी विद्यार्थ्यां कशा पद्धतीने अभ्यास केला पाहिजे , विद्यार्थ्यांनी औषध निर्माण कंपनीमध्ये रोजगार मिळवण्यासाठी कशा पद्धतीने मुलाखत घेतली जाते त्या मुलाखतीसाठी कशा पद्धतीने तयार केली पाहिजे, विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्ये असलेली मुलाखतीची भीती , भीती कशा पद्धतीने दूर केली पाहिजे अशा वेगवेगळ्या विषयावर विद्यार्थ्यांना या तज्ञांनी मार्गदर्शन केले. तसेच या दिवशी कॅम्पस इंटरव्यू मार्फत औषधनिर्माण कंपनीमधील मार्केटिंग क्षेत्रामध्ये मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह या पदावर विद्यार्थ्यांची निवड केली.

# एसपी साहेब...बीड शहरातच सुभाष रोड परिसरात पाच तर जालना रोडच्या गॅरेज लाईन परिसरात दोन

## हवाले पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिच्चून सुरु!

बीड जिल्ह्याला अवैध धंद्याचे ग्रहण लागलेले आहे. विविध प्रकारचे गैर व्यवहार जिल्ह्यामध्ये होतात. या गैर धंद्याच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढत आहे. नव्याने दाखल झालेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंदे आणि गुन्हेगारीवर आळा बसविण्यासाठी यंत्रणा टाईप केल्याने काही प्रमाणात नियंत्रण आले आहे मात्र ते पूर्णपणे बंद झालेले नाहीत. बीड सारख्या ठिकाणी हवाला रॅकेट मात्र मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे दिसत आहे. शहरातील सात ठिकाणी हे रॅकेट कार्यरत असून त्यासाठी काही कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या सातही ठिकाणाहून हवालाच्या माध्यमातून रोज कोट्यावधींची उलाढाल होत आहे. बीडच्या हवाला चे लागेबांधे राज्यातील सर्व मोठ्या शहरांशी जोडलेले आहेत. असे म्हटले जाते की मराठवाड्यामध्ये सगळ्यात जास्त व्यवहार बीड हवालाच्या मार्फतच होतात. हवालाच्या माध्यमातून लाखो रुपयांचे कमिशन रोज मिळविले जात आहे. ज्या सात ठिकाणाहून हा हवाला चालतो, त्याचे व्यवहार पाहण्यासाठी माणसाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पैसे मोजण्याच्या मशीन पासून

### सात ही हवाल्याचा वजिर 'तो' सचिन भोसले कोण याचा शोध लावा

नोंदी ठेवण्यासाठी कर्मचारी ठेवले गेले असून, कोड भाषेचा वापर करून हे रॅकेट चालविले जात आहे. एका मिनिटांमध्ये कोट्यावधी रुपयांची उलाढाल यामार्फत होताना दिसते. अवैध धंद्यावाले या हवालाचा सर्रासपणे वापर करतात, कारण त्यांच्या दृष्टीने हा पैसे मागवण्याचा आणि पाठविण्याचा सर्वात विश्वसनीय आणि सुरक्षित मार्ग आहे. यामुळेच अवैध धंद्यांना अधिक प्रोत्साहन मिळत असल्याचे दिसते. यावर नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांची कारवाई होणे आवश्यक आहे मात्र बीड पोलिसांकडून याकडे डोळेझाक होत आहे. काही पोलिसांना याचा हप्ता जात असल्याचेही बोलले जात आहे. आता पोलीस अधीक्षक कॉवत



आल्यापासून या व्यवहाराला थोडी अडकाठी येत आहे, मात्र ठिकाण बदलून हवाला दररोज सुरूच आहे. हवाला करणाऱ्यांना पोलिसांची कसलीच भीती नसल्याने ते राजरोसपणे व्यवहार करताना दिसतात. पोलीस कारवाई होत का नाही असा प्रश्न सगळ्यांनाच पडलेला आहे मात्र याचे उत्तरही पोलिसांकडेच आहे. शहरामध्ये हवालाची ठिकाणे कोणती आहेत याची पोलिसांना कल्पना असेल किंवा नसेल मात्र नाही असे गृहीत धरून आम्ही आज ज्या सात ठिकाणाहून हवाला चालतो त्या ठिकाणचे पत्ते देत आहोत. या माहितीवरून तरी पोलिसांनी कारवाई करावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### या सात ठिकाणाहून चालतो हवाला...

स्टेडियम जवळील वैद्यनाथ बँकेच्या समोर, सारडा नगरी, कब्बाड गल्ली कॉर्नर, अण्णाभाऊ साठे चौक, जालना रोड, गॅरेज लाईन जालना रोड बीड. अशा या सात ठिकाणाहून हवाला रॅकेट चालत असल्याची खात्रीलायक माहिती असून, पोलिसांनी याची अधिक माहिती मिळवावी आणि कारवाई करावी अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

बीड सारख्या छोट्याशा शहरांमध्ये सात ठिकाणाहून हवाला रॅकेट चालत आहे. या ठिकाणाहून दररोज कोट्यावधींची उलाढाल होत असून, या गैर पद्धतीच्या व्यवहारावर कोणाचेच बंधन असल्याचे दिसत नाही. यावर नियंत्रण आणण्याचे काम पोलिसांचे असून पोलीस मात्र आपले कर्तव्य विसरून सुस्त झाल्याचे पाहायला मिळतात. कदाचित पोलिसांना ज्या ठिकाणाहून हवाला रॅकेट चालते ती ठिकाणे माहीत नसावीत म्हणून आज आम्ही त्या ठिकाणांची पत्ते देणार असून, पोलीस आता तरी कर्तव्याला जागतील आणि आपले काम इमाने इतबारे करतील, अशी अपेक्षा आहे.

## अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा : एपीआय मंगेश साळवे

दौलावडगाव । किसान न्युज रब्बी हंगामातील सध्या सुगीचे दिवस सुरू असल्याने आपल्या मुला बाळासह शेतात राबतांना शेतकरी दिसत आहे.सर्वच शेतकरी कुटुंब,शेत मजूर शेतात राबत असल्याने शेजारी व घरी कुणीच नसल्याचा यांचा फायदा उचलून चोरी सारख्या घटना खुप वाढल्या आहे. याबाबत नागरिकांनी सतर्क राहून अनोळखी व संशयास्पद व्यक्ती दिसल्यास पोलिस स्टेशन अंभोरा यांना संपर्क साधावा अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत एकूण ८७ गावे आहेत.कुठेना कुठं चोरी सारख्या घटना घडत आहे. ही खूप दुःखद आहे. मी मागील एक वर्षापासून प्रत्येक गावात सीसीटीव्ही बसवण्याकरता तोंडी तसेच लेखी पत्रक दिले आहेत. तसेच गावभेटी दरम्यान, शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सध्या परिस्थितीत सीसीटीव्हीचे किती महत्व आहे. याबाबत पटवून दिलेले आहे. परंतु बोटावर मोजणे इतके गाव सोडून इतर गावानी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी पुढाकार घेतलेला नाही. आतापर्यंत झालेल्या चोऱ्या या सर्व सामान्य कुटुंबातील शेतकरी/ मजूर यांच्या घरात झालेल्या आहेत. आपला शेतकरी दिवसरात्र शेतात राबराब राबतो. अनेकदा त्याला निसर्गही साथ देत नाही. शेतातून मिळालेल्या तुटपुंज्या उत्पन्नावर तो स्वतःच्या आशा आपेक्षाना तिलांजली देत,स्वतःच्या मनाला मारून घरातील माय-लेकरांसाठी काटकसर करून थोडेफार दाग दागिने करतो. तसेच संसार चालवण्यासाठी थोडीशी रोख रक्कम घरामध्ये ठेवत असतो आणि नीच प्रवृतीचे लोक गरिबांनी घाम



गाळून कमावलेल्या उत्पन्नावर डल्ला मारतात. आज दुसऱ्याच्या घरामध्ये चोरी झाली,उद्या याच घटना कदाचित आपल्याही घरी घडू शकतात. या घटनांना पूर्णतः आळा बसावायचा असेल तर आपल्याला सर्वांना एकत्र येऊन याच्याविरुद्ध एक विचाराने लढावे लागेल. मला खात्री आहे. आपण आपल्या गावात एक विचाराने एकत्र येऊन गावातील प्रत्येक कुटुंब सुरक्षित व्हावे या हेतूने फालतू गोष्टीवर पैसा उधळण्यापेक्षा गावात सीसीटीव्ही बसवण्यासारख्या सामाजिक उपक्रमावर पैसा खर्च कराल. तसेच गावातील प्रत्येक दुकानदार, हॉटेल चालक इत्यादी व्यवसायिक आपल्या आस्थापनेवर किमान एक तरी सीसीटीव्ही कॅमेरा बसवतील. आपण सर्वांनी मिळून आम्हाला साथ दिली तर मी खात्रीपूर्वक आपणाला ग्वाही देतो की, आपण गुन्हेगारी प्रवृत्तीला शंभर टक्के आळा बसवण्यात यशस्वी होऊ. गावातील प्रत्येक नागरिकांना कळकळीची विनंती आहे की, आपण सर्वांनी वरील गोष्टीच गांभीर्य लक्षात घेत स्वतः पुढाकार घेऊन आपल्या गावात किमान येणाऱ्या जाणाऱ्या रस्त्यावर कोणत्याही परिस्थितीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घ्यावे. सीसीटीव्ही बसवल्यास आपण गुन्हेगारीला निश्चितपणे आळा बसवू शकतो. बघा कुटुंबासाठी, गावासाठी यावर नक्कीच विचार करा आणि तो विचार सत्यात, कृतीत आणण्यासाठी मनापासून प्रयत्न करा. कोठेही कधीही अडचण आली तर मला सपर्क करा. आपल्या सेवेसाठी अंभोरा पोलिस स्टेशन सदैव तत्पर आहोत. (मंगेश साळवे) प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे अंभोरा

## विनापरवाना वाळू वाहतूक करणारा टिप्पर पकडला

### २० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त



विनापरवाना बेकायदेशिर रित्या वाळूची वाहतूक करून चोरट्या पध्दतीने विक्री करण्याच्या हेतुन सहा ब्रास वाळूने भरलेला टिप्पर आष्टी पोलिसांनी शुक्रवारी रात्री बीड-नगर राष्ट्रीय महामार्गावरील आष्टी येथे पकडून २० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. बीड-नगर राष्ट्रीय महामार्गावरील हंबड विद्यालयासमोरील रोडवर आष्टी येथे ३१ जानेवारी रोजी रात्री बारा एक च्या दरम्यान वाळूने भरलेला टिप्पर क्रमांक एम.एच १६,सी.सी.५७६९ हा विनापरवाना,बेकायदेशीररित्या वाळूची वाहतूक करून तिची चोरटी विक्री करण्यासाठी थांबलेला असताना आष्टी पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नामदेव धनवडे यांनी त्याला टिप्परसह ताब्यात घेत २० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त करत पोलिस अंमलदार अशोक तांबे याच्या फिर्यादीवरून आरोपी अमोल रावसाहेब कोठावळे याच्यावर कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक नामदेव धनवडे करीत आहे.

## चुकीचा पूल बांधणाऱ्या अभियंता अन् गुत्तेदाराकडून रक्कम वसूल करा

बीड रेल्वे मार्गावरील चऱ्हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पूल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला आहे. याची चौकशी करुन अभियंता आणि पूलाचे कामकरणाऱ्या गुत्तेदाराकडून याची रक्कम वसूल करावी अन्यथा पुलावरच आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदनाद्वारे दिला.



अहमदनगर- बीड -परळी रेल्वे मार्गावरील बीड तालुक्यातील चऱ्हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने पाडण्यात येत होता

# राज्यातील ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक सुविधा उपलब्ध

मुंबई - प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेने शाळा सर्वेक्षणाचा (ग्रामीण) अहवाल (असर) प्रकाशित केलेला आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत असर अहवालाबाबत काही मुद्दे स्पष्ट करण्यात आले आहेत. संस्थेने २०.४ टक्के विद्यार्थ्यांकडून संगणकाचा वापर होत असल्याचे अहवालामध्ये म्हटले आहे. तथापि, एकूण १,०८,१४४ शाळांचा विचार करता संगणकाचा वापर करण्याचे प्रमाण ७२.९५ टक्के इतके आहे. सदर संस्थेने ४८.३ टक्के शाळांमध्ये संगणक नसल्याचे नमूद केले आहे. वास्तविकतः एकूण शाळांपैकी ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक सुविधा उपलब्ध आहे. मुलींकरिता साधारणतः ९६.८ टक्के इतक्या शाळांमध्ये स्वच्छतागृहांची उपलब्धता असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. प्रथम या संस्थेने ४०९ प्राथमिक व ४६३ उच्च प्राथमिक व त्यावरील अशा ग्रामीण भागातील एकूण ८७२ शाळांचे सर्वेक्षण केले आहे. युडायस डाटा सन २०२३-२४ अनुसार राज्यामध्ये एकूण १,०८,१४४ शाळा आहेत. प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेने एकूण शाळांच्या केवळ ०.८१ टक्के इतक्या शाळांचेच सर्वेक्षण केलेले आहे. तसेच राज्यातील एकूण २,०९,६१,८०० शालेय विद्यार्थ्यांपैकी केवळ ३३,७४६ मुलांचे सर्वेक्षण संस्थेने केले आहे जे की एकूण विद्यार्थ्यांच्या केवळ ०.१६ टक्के इतके आहे. या आधारांवर अहवाल प्रकाशित केलेला आहे. या संस्थेने प्रकाशित केलेल्या अहवालामध्ये बरेच सकारात्मक मुद्दे देखील आहेत. यातील काही महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत वय



वर्ष ६ ते १४ मधील ६०.९ टक्के बालके ही शासकीय शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत तर ३८.५ टक्के बालके ही खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. इयत्ता पहिली व दुसरी मधील वाचन व गणितीय क्रिया यामध्ये विद्यार्थ्यांची संपादणूक व अध्ययन स्तर हा वाढल्याचे दिसून येते. इयत्ता तिसरी मधील पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यामध्ये कोरोना मध्ये झालेला अध्ययन क्षय भरून काढण्यात येत आहे असे दिसून येते. शासकीय शाळांमध्ये सन २०२२ च्या तुलनेमध्ये सन २०२४ मध्ये वाचनामध्ये १०.९ टक्के प्रगती दिसून येते. तर खाजगी शाळांमध्ये वाचनामध्ये ८.१ टक्के प्रगती दिसून येते. गणितीय क्रियांमध्ये शासकीय शाळांमध्ये १३.१ टक्के प्रगती दिसून येते व खाजगी शाळांमध्ये ११.५ टक्के प्रगती दिसून येते. इयत्ता तिसरीतील मुले जी इयत्ता दुसरीच्या पातळीचे वाचन करू शकतात याचे महाराष्ट्राचे प्रमाण देशपातळीपेक्षा १० टक्क्यांनी जास्त आहे. इयत्ता तिसरी मध्ये गणितीय क्रियांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्र हा देशातील पहिल्या पाच राज्यांमध्ये आहे. २०२२ च्या तुलनेमध्ये २०२४ मध्ये यात १३ टक्क्यांची वाढ दिसून येते. इयत्ता पाचवीच्या मुलांमध्ये सन २०२२ च्या तुलनेमध्ये सन २०२४ मध्ये वाचनामध्ये २.२ टक्के अधिकची प्रगती झाल्याचे दिसून येते. वय वर्ष १५ ते १६ याच्यामध्ये ९८ टक्के विद्यार्थी हे शाळांमध्ये प्रवेशित आहेत. सर्वात कमी शाळाबाह्य विद्यार्थी असणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र हे एक राज्य आहे. वय वर्ष १४ ते १६ मधील विद्यार्थ्यांच्या डिजिटल साधनांची उपलब्धता मध्ये राज्यातील ९४.२ टक्के विद्यार्थ्यांच्या घरी स्मार्टफोन आहे व यातील ८४.१ टक्के विद्यार्थी त्याचा वापर करू शकतात. यामधील १९.२ टक्के विद्यार्थ्यांनी स्वतःचा स्मार्टफोन असल्याचे नमूद केले आहे. यातील ६३.३ टक्के विद्यार्थी हे शिक्षणाच्या संदर्भात स्मार्टफोनचा वापर करतात, तर विविध सामाजिक माध्यमांसाठी ७२.७ टक्के विद्यार्थी स्मार्टफोनचा वापर करतात

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com